करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...

परखड अग्रलेख | वस्तुनिष्ठ बातम्या
विविध सदरे | करमाळेकरांची खास ओळख

संस्थापक संपादक : डॉ.अॅड.बाबूराव हिरडे
संपादक : सौ.उषादेवी बाबूराव हिरडे,
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

वर्ष 31 वे

साप्ताहिक कमलाभवानी

# संदेश

www.saptahiksandesh.com | kamalabhavanisandesh@gmail.com

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३३ वे | अंक क्र.९७ | पाने-१६ | दि.७/१०/२०२२ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ३ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
संपर्क 9822058106

॥ श्री कोटलिंग प्रसन्न ॥
मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी..!
शिवम स्टिल अॅन्ड सिमेंट एजन्सी
टी.एम.टी.बार चे अधिकृत विक्रेते
प्रोप्रा : अमोल बबन ढवळे
(9850125561, 9423339966)
खडी, क्रॅशसॅण्ड योग्य दरात मिळेल
पत्ता : नगर-सोलापूर बायपास रोड, करमाळा.
आयकॉन स्टीलचे अधिकृत विक्रेते

# घरकुल योजनेत ७४२ घरांसाठी ८ कोटी ९० लाख ४० हजार रू. मंजूर

## लाभार्थ्यांनी मुदतीत घरे पूर्ण करावीत : गटविकास अधिकारी मनोज राऊत

करमाळा : तालुक्यातील १०८ ग्रामपंचायती व ११८ गावामध्ये आवास प्लस योजनेमध्ये (ड फार्म) १३ हजार ७२४ लाभार्थ्यांची प्रतिक्षा यादी आहे. यामध्ये यावर्षी ९८६ लाभार्थ्यांचे उद्दीष्ट असताना त्यात ७४२ लाभार्थ्यांना घरकुलासाठी ८ कोटी ९० लाख ४० हजार रुपये मंजूर झाले आहेत. संबंधित लाभार्थ्यांना याची माहिती दिली असून, त्यांनी तीन महिन्याच्या मुदतीत आपली घरे पूर्ण करावीत; असे आवाहन गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी केले.

याबाबत जादा माहिती देताना गटविकास अधिकारी राऊत म्हणाले, की आवास प्लस योजनेतून मंजूर झालेल्या ७४२ घरकुला पैकी ३२ घरकुले पूर्ण झाली आहेत. पंतप्रधान घरकुल आवास योजनेतून २०१७ ते २०२२ पर्यंत ३३५५ घरकुलाच्या उद्दीष्टापैकी ३१०० घरकुलांना मंजुरी मिळाली असून, त्यासाठी ३७ कोटी २० लाख रुपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी २३३७ घरकुले पूर्ण झाली आहेत. तर रमाई आवास योजनेतून २०१७ ते २०२२ पर्यंत १९८० घरकुलांना मंजुरी मिळाली असून त्यासाठी २३ कोटी ७६ लाख रूपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी आत्तापर्यंत १३७२ घरकुले पूर्ण झाली असून उर्वरित घरकुलाची कामे प्रगतीपथावर आहेत. शबरी आवास योजनेतून २१ घरकुले मंजूर झाले असून त्यातील १२ घरकुले पूर्ण झाली आहेत तर उर्वरित प्रगतीपथावर आहे. (पान ४ वर)

### जागा घेण्यासाठी व डबल मजला बांधण्यासाठी परवानगी



घरकुल योजनेसाठी एक घर बांधण्यासाठी १ लाख २० हजार रूपये मंजूर होतात तसेच रोजगार हमीतून काम केल्यास २२ हजार रुपये दिले जातात. हे काम मंजुरी मिळाल्यापासून तीन महिन्यात पूर्ण करणे आवश्यक आहे. ज्या लाभार्थ्यास जागा उपलब्ध नाही, अशा लाभार्थ्यांना पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी योजनेतून ५० हजारा पर्यंत अनुदान मिळू शकते. यावर्षी ३० लाभार्थ्यांना हे अनुदान देण्यात आले असून, नव्याने २२ प्रस्ताव दाखल झाले आहेत. जी प्लस - १ योजनेतून डबल मजला बांधण्यास परवानगी देण्यात आली आहे. ज्यांना जागा कमी आहे, त्यांना या योजनेचा फायदा होत असून आत्तापर्यंत कोंढारचिंचोली, बिटरगाव (वांगी), पोथरे, गुळसडी या गावात पाच घरकुले बांधण्यात आली आहेत.

..मनोज राऊत (गटविकास अधिकारी करमाळा)

यु.एस. बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स
खास दसरा-दिवाळीच्या शुभमुहूर्तावर..
भविष्यातील दरवाढीचा विचार करून आजच आपल्या स्वप्नातील
रो-हाऊस बुकींग करा !
आपल्या मनातील घर सुलभ हप्त्यामध्ये
कर्ज सुविधा उपलब्ध



फ्लॅट नाही, आता मोठं घर घ्या..!
साईट : श्री कमलादेवी मंदिर जवळ, लक्ष्मीहरी नगर, एस.टी.कॉलनी शेजारी, करमाळा.
• संपूर्ण बांधकाम वाळू व राजुरी स्टील मध्ये.
• किचनमध्ये अल्ट्रा अॅक्वा प्युरिफायर/इनव्हर्टर.
• स्वतंत्र बोअर. • १००० लिटरची पाण्याची टाकी.
• प्रत्येकाला स्वतंत्र पार्किंग सुविधा व कंपाऊंड वॉल
• हॉल, किचन व बेड संपूर्ण पीओपी एलईडी फोकससह.
• मुख्य दरवाजा लोखंडी सेफ्टी गेटसह
• कंपाऊंडला लोखंडी गेट
या व्यतिरिक्त अजून बरेच काही..!
कलेक्टर एन.ए.प्लॉट मिळतील.
संपर्क : त्रिंबके बंधू
सोनल त्रिंबके -.09421262944, उमेश त्रिंबके-09156361844

शेतीतील पिकातील सातत्य ठेवल्यास उत्पादन आणि भाव मिळवता येतो !

संपादकीय.......................................

# सावकारी वृक्ष बहरला..!

गेल्या काही दिवसापूर्वी एक तरूण धावत-धावतच विशेषतः स्वतःला लपवत कार्यालयात आला. आल्या-आल्या म्हणाला, 'साहेब माझ्या जीवाला धोकाय, मला वाचवा.' 'काय झालं ?' "अहो, एका सावकाराचे कर्ज घेतले आणि त्यांचे पैसे द्यायला जमले नाही, त्याच्यामुळं सावकाराची लोकं मला मारायला आलती, पण मी जीवाच्या आकांताने पळालो, ऊसात दबा धरून बसलो, ते लोक ऊसात आले मग मी एका खड्ड्यात कपडे काढून रात्रंभर लपून बसलो. ते लोक जसे गेले तसा लपत छपत येथे आलो..!" 'मग तुम्ही पोलीसात जा !' 'नाही साहेब, पोलीसात नाही जाता यायचं. ते लोक जीवच घेत्याल.' असं म्हणून तो थोडा थांबला अन् म्हणाला, 'नाही आता मी पळूनच जातो !' असे म्हणून जसा लपत छपत आला तसाच पुन्हा तो गेला. तो परत काही आला नाही. अशाप्रकारे सावकारी पैसे घेतल्यानंतर अनेक घटना घडत आहेत. अलीकडे 'सावकारीचा वृक्ष' मोठ्या प्रमाणात बहरलेला आहे.

गेल्या काही वर्षात अपवाद वगळता तालुक्यातील पतसंस्था बंद पडल्या आहेत. अलिकडे करमाळा शहरातील नगर अर्बन बँकेची शाखा, शंकरराव मोहिते-पाटील बँकेची शाखा आणि नुकतीच करमाळा अर्बन बँक अडचणीत आली आहे. बँका आणि पतसंस्थांचा कर्जपुरवठा थांबल्याने म्हणतात 'गरजवंताला अक्कल नसते' त्यानूसार अनेकांना इच्छा नसूनही सावकाराकडे जावे लागत आहे. अलिकडे सावकार आणि सावकारीन अशा दोन घटकांकडून पैसे दिले जातात. कदाचित सावकार व्याजाला सांभाळून घेऊ शकतो; पण सावकारीन बाई मात्र सावकाराला अजिबात सोडत नाही. महिला असल्यामुळे कर्जदारही घाबरत घाबरत कर्ज फेडतो आणि एक कर्ज फेडताना दहा ठिकाणाहून कर्ज काढून पूर्ण डब्यात जातो.

पूर्वी एकच माणूस सावकार म्हणून कार्यरत असायचा. आता वेगवेगळ्या रूपात सावकार सावकारकी करत आहेत. यात भिसी, फायनान्स, सोन्याचे दागिणे व जमिनी गहाण ठेवून हा व्यवसाय चालतो. शासनाच्या नियमाला बगल देत सावकारकी सुरू आहे. शासनाने फायनान्स अथवा खासगी सावकार यांना मान्यता देताना तारण कर्जावर दरवर्षी १२ टक्के व विनातारणावर दरवर्षासाठी १५ टक्के व्याज घेण्यास परवानगी दिलेली होती. असा परवाना मुंबई सावकारकी अधिनियम १९४६ कलम ७ नूसार दिला जातो. यासाठी ग्रामपंचायत / नगरपालिका यांचे संमतीपत्र, पोलीस अधिक्षकांचा वर्तणुकीचा दाखला, पतसंस्था किंवा बँका यांचे सभासद, कर्जदार, जामीन व संचालक नसल्याचे प्रतिज्ञापत्र द्यावे लागते. आणि त्यानंतर सावकारी परवाना दिला जातो.

काही लोक असा परवाना मिळवतात, पण शासनाच्या नियमाला हारताळ फासून व्याजाचा दर दरमहा तीन टक्के पासून ते पाच, दहा, पंधरा एवढेच काय पस्तीस टक्क्या पर्यंत व्याज घेतात तर काही महाभाग दिवसाला व्याज घेतात. उदा. दहा हजार रूपये व्याजाने घेतलेतर रोज दोनशे किंवा तीनशे रूपये व्याज द्यायचे. तसेच हे व्याज जर थकलेतर ती रक्कम मुद्दलेत जमा करून त्याच्यावर पुन्हा व्याज घेतले जाते. या सावकारीसाठी मधल्याकाळात पतसंस्थांचा मोठा वापर झाला व दुर्दैवाने सावकार पोसले आणि पतसंस्था नेस्तनाबूत झाल्या. अशीच गत भिसीवाल्यांची पण झालेली आहे. सध्या काही सावकार जमीन अटीला म्हणून खरेदी करून मगच कर्ज देतात. एवढे असूनही ठराविक मुदतीत पैसे आले नाहीतर संबंधित कर्जदारास पकडून आणून ठराविक ठिकाणी डांबून ठेवले जाते. त्यानंतर पैसे आले नाहीतर त्याला मारहाण करून त्याच्यावर दहशत बसवली जाते. अशाच प्रकारे खासगी सावकारची कर्ज वसुली असते. काही लोक सकाळी शंभर रूपये देतात व संध्याकाळी एकशे दहा रूपये घेतात. तर काही लोक आठवड्याला दहा टक्के आणि काहीजण तर थेट पस्तीस टक्क्यापर्यंत व्याज घेतात. खासगी सावकार कर्ज देतानाच व्याजाची रक्कम कापून घेतात. म्हणजे दहा हजार कर्ज द्यायचे असेलतर सहा हजार पाचशे हातात टेकवायचे व महिन्याकाठी दहा हजार घ्यायचे. ठराविक मुदतीत पैसे दिले नाहीतर दिवसाला वेगळा दंड सुरू होतो. तो दंड, मुद्दल आणि व्याज संबंधिताला द्यावे लागते. सावकारांच्या पाठीशी शासन नसलेतरी त्याने स्वतःचे वेगळे प्रशासन निर्माण केलेले आहे.

कायद्यानूसार विना परवाना एखाद्याला कर्ज दिलेतर ती रक्कम सावकाराला वसूल करता येत नाही. न्यायालयात त्याचा दावा दाखल करून घेतला जात नाही. तसेच अनाधिकृत सावकारास कर्जदाराची मालमत्ता ताब्यात घेता येत नाही आणि तशी मालमत्ता ताब्यात घेतल्यास ती मुळ मालकास परत देण्याचा अधिकार सहकार निबंधकास आहे . एवढेच नाहीतर एखाद्या व्यक्तीची मालमत्ता संशयितरित्या सावकाराच्या ताब्यात असल्यास ती कर्जदारास परत देण्याचा अधिकारही निबंधकास आहे. म्हणजे एखाद्या व्यक्तीची मोटारसायकल किंवा ट्रॅक्टर किंवा कोणतेही वाहन हे मूळमालकाच्या ताब्यात असण्याऐवजी सावकाराच्या ताब्यात असेलतर ते वाहन मूळमालकास तात्काळ परत देण्याचे अधिकार आहेत. प्रत्येक सावकाराने नियमानूसार रोकडवही व खातेवही ही ठेवलीच पाहिजे. तशी ठेवली जात नसेलतर त्याचा परवाना रद्द केला जातो. विशेष म्हणजे सावकाराचा परवाना रद्द करणेकामी समाजातील कोणत्याही व्यक्तीला अर्ज करता येतो. याशिवाय जादा माहितीसाठी सर्वसामान्य नागरीकांच्या मदतीसाठी शासनाची ०२२-४०२१९३०० या क्रमांकाची हेल्पलाईन आहे. पण अनेकजण लायसन्स नसतानाच हा व्यवसाय करतात आणि त्यांचा व्यवसाय तेजीत चालू आहे. विशेष म्हणजे सर्वसामान्य लोकही कमी व्याजदराचे बँकांचे कर्ज भरत नाहीत, बँका अडचणीत आणतो आणि सावकाराचे व्याज चौपट, पाचपट असूनही वेळेत भरतो ही सुध्दा आपली चुक आपण लक्षात घेतली पाहिजे.

विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये सावकाराच्या अत्याचारातून अनेकांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यामुळे शासन गतिमान झाले असून सावकारी कायदे कडक केलेले आहेत. असे कायदे अस्तित्वात असूनही तालुक्यामध्ये खुलेआम सावकारी केली जाते. देणार व घेणार दोघेही एकमेकाच्या विचाराने हा व्यवहार करत असल्याने इतरांना त्यात हस्तक्षेप करता येत नाही. आपले सर्वस्व संपत असतानाही काहीजण सावध होत नसतीलतर नाविलाज आहे.

आणखी विशेष बाब म्हणजे ज्या महिला सावकारी करतात त्यांची वेगळी स्टाईल आहे. एका महिलेकडून एकाने घेतलेले कर्ज परत करता आले नाही, सदरचा इसम हा कर्ज बुडविण्याच्या तयारीत असल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित सावकार महिलेने या व्यक्तीने माझ्यावर अत्याचाराचा प्रयत्न केला अशा आरोपाचा अर्ज पोलीसात दिला. पोलीसांची चौकशी सुरू झाल्यानंतर या कर्जदारास स्वतःचे घर गहाण ठेवून ती महिला म्हणेल तेवढे पैसे देऊन सुटका करून घ्यावी लागली. शिवाय पोलीसांचा खर्च वेगळाच. अशाच सावकार महिलेने एका तरूणास आपल्या मोहपाशात गुंतवून किरकोळ रकमेच्या बदल्यात पाच लाख रूपये वसुल केले आणि त्याला आयुष्यातून कायमचा उध्वस्त केला. कधी कधी सावकारावरही बाजी उलटते. काही वर्षापूर्वीची घटना आहे. बसस्थानकात छोट्या-छोट्या वस्तू विकणाऱ्या तरूणाने भिसीच्या माध्यमातून पैसे उचलले आणि चालक-वाहकाला जमेल त्या व्याजाने कर्ज दिले. काही दिवस बरे चालले होते, पण कर्ज काही वसुल होईना आणि भिसीला पैसे वेळेला जाईना. दुर्दैवाने या सावकाराला लाखो रूपये कर्जाची व व्याजाची रक्कम सोडून पळून जावे लागले आहे.

अलिकडे काहीजण बाजारभावापेक्षा ५० टक्क्यात जमीन खरेदी करायची आणि पुढे तेवढ्या रकमेवरच ती जमीन बळकवायची. अशारितीने शेकडो एकर जमिनीचे व्यवहार झालेले आहेत.. अशा स्थितीत प्रत्येक व्यक्तीने अनावश्यक बाबीस फाटा देऊन, घरगुती समारंभ साधे करून, व्यसनमुक्त राहून, जमेल तशी बचत केल्यास व कोणतीही बाब प्रतिष्ठेची न केल्यास कर्जाऊ रक्कम घेण्याची वेळ येणार नाही. अन्यथा दुष्काळ असो नाहीतर सुकाळ असो, सावकारांचा वृक्ष बहरतच जाणार आहे..!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# हार्दिक अभिनंदन अभिनंदन अभिनंदन अभिनंदन



यशकल्याणी सेवाभावी संस्थे तर्फे २५ हजाराची देणगी स्विकारताना कमलाई अबॅकस क्लासेसच्या संचालिका सौ.मंजुश्री मुसळे मॅडम, एलिझाबेथ आसादे मॅडम, गणेश करे-पाटील व अनिल बदे सर



यशकल्याणी संस्थेच्या वतीने कमलाई अबॅकस क्लास मधील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले त्याचे छायाचित्र

प्रो. ॲक्टीव्ह अबॅकस प्रा.लि; कंपनी तर्फे जून २०२२ मध्ये घेतलेल्या समर नॅशनल स्पर्धेत देशातील ४५०० विद्यार्थ्यांत

**करमाळ्यातील कमलाई अबॅकस क्लासेसच्या ३९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यश संपादन केले.**

त्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन ! या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान यशकल्याणी सेवाभावी संस्था तर्फे करण्यात आला तसेच यशाबद्दल **कमलाई अबॅकस क्लाससाठी २५ हजाराची देणगी** देण्यात आली आहे.

त्याबद्दल यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष **श्री.गणेश करे-पाटील** यांचे हार्दिक आभार !



सौ.मंजुश्री मुसळे (संचालिका)

KAMLAI PROACTIVE ABACUS Creating Maths-Magicians

**मंथन, बुध्दीवंत, स्कॉलरशिपच्या तयारीसाठी...**

## 'अबॅकस' आहे जरूरी..!

**६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सुरू..!**

- मुलांमध्ये एकाग्रता, स्मरणशक्ती, लॉजिकल थिंकिंगमध्ये वाढ होते.
- स्कॉलरशीप, ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षांमध्ये उपयोग होतो.
- गणिताची आवड व गोडी निर्माण होते.
- रंगीत स्टडी मटेरियल
- विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या भव्य स्पर्धांचे आयोजन

संपर्क **कमलाई**
**ब्रेन डेव्हलपमेंट अबॅकस क्लासेस**
'यशोदीप' मंगळवार पेठ, करमाळा., जि.सोलापूर
मो.9881062056, 7620705811

शुभेच्छुक **कमलाई अबॅकस क्लासेस, करमाळा.**

पान १ वरून...

# घरकुल योजनेत ७४२ घरांसाठी ८ कोटी ९० लाख ४० हजार रू. मंजूर

पारधी आवास योजनेतून सात घरकुले मंजूर असून सातच्या सात पूर्ण झाली आहेत.

या योजनेतून ज्या लोकांना अद्याप लाभ मिळाला नाही किंवा प्रतिक्षा यादीत नाहीत; अशा वंचित लाभार्थ्यांनी आपली नावनोंदणी ग्रामपंचायतीकडे तात्काळ करावी; असे आवाहन कनिष्ठ सहाय्यक वैभव माने यांनी केले.

# सरपंच परिषदेच्या तालुका समन्वयक पदी सुजित बागल



करमाळा(सं.प्र.) : मांगी येथील सामाजिक कार्यकर्ते सुजित बागल यांची सरपंच परिषदेच्या तालुका समन्वयक पदी निवड करण्यात आली आहे.

गेल्या अनेक वर्षापासून मांगी येथील सामाजिक कार्यात अग्रेसर, त्याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात आमदार संजयमामा शिंदे यांचे समर्थक म्हणून जनतेच्या अडीअडचणी सोडवत आहेत. तसेच ते मांगी ग्रामपंचायतचे सदस्य आहेत. या माध्यमातून मांगी गावासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिलेला आहे. रस्ते, पथदिवे, हायमास्ट दिवे, विठ्ठल-रूक्मीणी मंदिरासाठी, पाणीपुरवठा निधी, आमदार निधीतून मांगीसह इतर गावांनाही सुजित बागल यांच्या प्रयत्नातून निधी देण्यात आलेला आहे. त्यामुळे सुजित बागल यांचे कार्य पाहून करमाळा येथे म.राज्य सरपंच परिषद मुंबई यांच्या तर्फे सरपंच परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त सुजित बागल यांची सरपंच परिषद प्रदेश सरचिटणीस ॲड.विकास जाधव व प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांचे हस्ते निवडीचे पत्र देवून तालुका सरपंच परिषद समन्वयक पदी निवड करण्यात आली. तसेच सरपंच परिषदेच्या तालुका उपाध्यक्ष पदी ॲड.दत्तात्रय सोनवणे (पांगरे) सरचिटणीस पदी सतीश ओहोळ (सालसे), सचिव पदी मदन पाटील (पिंपळवाडी), सहसचिव पदी विक्रम धायतोंडे (रोशेवाडी) यांची निवड करण्यात आली आहे.

# शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी असिफ जमादार



करमाळा(सं.प्र.) : करमाळा नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या न.पा.प्राथमिक मुलींची शाळा नं.२ शाळेच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी असिफ फारूक जमादार यांची निवड करण्यात आली आहे. सचिव पदी मुख्याध्यापक बलभिम शिंदे यांची निवड करण्यात आली. पालक सभेत जमादार यांची निवड करण्यात आली. यावेळी नगरसेवक संजय सावंत, साजिद मोमीन, सुभाष आवताडे, समीर बागवान, अमर सुरवसे, जमीर बागवान, अजरोद्दीन शेख, शुभांगी खळदकर, स्नेहा सरवदे यांचेसह शिक्षक वर्ग उपस्थित होते.







## ओजस हॉस्पिटल
OJS HOSPITAL

AIIOPATHY AYURVED HOMEOPATHY

डॉ.रोहन रामदास कुंभार
B.A.M.S. M.D.(Acu) D.G.O. स्त्रीरोग तज्ञ

डॉ.मनोज रामदास कुंभार
M.D. कन्सलटींग फिजीशीयन

डॉ.सौ.अंजली रोहन कुंभार
B.H.M.S. होमिओपॅथिक कन्सलटंट

* वेळ : सकाळी ८ ते रात्री ८ *
* २४ तास अत्यावश्यक सेवा *

डॉ.सौ.सायली मनोज कुंभार
M.sc. Biotech, Health & Nutrition आहारतज्ञ

ॲलोपॅथी, आयुर्वेद होमिओपॅथी शास्त्रांच्या संयुक्त चिकित्सा पध्दतीने खालील आजारांवर अचूक निदान व योग्य उपचार • हृदयरोग व उच्च रक्तदाब • मधुमेह • थायरॉईड • संधिवात • पोटाचे आजार • स्त्रियांचे आजार • श्वसनसंस्थेचे आजार • मणक्यांचे व हाडांचे विकार • मुतखडा • मुळव्याध • सौंदर्य समस्या • त्वचारोग व केशविकार • आहारविषयक मार्गदर्शन..

उपलब्ध सुविधा : ECG, Multipara Monitor, Nebulisation(वाफेची सुविधा)
Glucometer (रक्तातील साखर तपासणी), प्रकृतीपरिक्षण, नाडीपरिक्षण
PAP SMEAR LBC, HPV DNA PCR, VILI & VIA Screening Test
(गर्भाशय मुख कर्करोग पूर्व तपासणीसाठी पुणे येथील नामांकीत लॅब गोलविलकर मेट्रोपोलिसशी संलग्नित)

पत्ता : चिवटे बंधू मिठाईवाले यांच्या समोर, घोलप ज्वेलर्सच्या वरच्या मजल्यावर सुभाष चौक, मेनरोड, करमाळा. • संपर्क : मो.9960334005, 9423333950


# पोमलवाडी येथे सर्वात मोठा संगणक कक्ष





करमाळा(सं.प्र.) : पोमलवाडी येथे सर्वात मोठा संगणक कक्ष साकारला असून सदर संगणक कक्षाचे उद्घाटन गटविकास अधिकारी मनोज राऊत व यशकल्याणी सामाजिक संस्थेचे गणेश करे-पाटील, विस्तार अधिकारी राजकुमार पाटील, सुर्यकांत पाटील, ॲड.अजित विघ्ने यांचे उपस्थित संपन्न झाले. हा कार्यक्रम ग्रा.पं. पोमलवाडी, शालेय शिक्षण समिती, जि.प. शाळा, सरपंच संग्राम पाटील मित्र परिवार व ग्रामस्थ तर्फे करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर गार्डनमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

पोमलवाडी येथील तरूणांनी या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात गार्डन तयार केलेले असून या ठिकाणी एक आकर्षक बागबगीचा तयार होत आहे. तसेच पोमलवाडी येथील कु.मोनाली भोपते व कुटूंबियांनी पोमलवाडी शाळेला २० संगणक संच भेट दिले असून, सुसज्ञ लॅब तयार करण्यात आली आहे. तसेच शाळेत सुसज्ञ इनडोअर गेम्स हॉल, सायन्स हॉल तयार करण्यात आलेला आहे. शालेय परिसरासह पोमाई मंदिर शिवाजी महाराज उद्यान येथे वृक्षारोपण करण्यात आले. सुत्रसंचालन अनिल पानसरे यांनी केले तर प्रास्ताविक सिकंदर शेख यांनी केले.


## गाळा भाड्याने देणे आहे

जुना बायपास रस्ता रोडटच असलेला,
छत्रपती चौका पासून जवळ असलेला व्यापारी गाळा
(साईज-१९ X १३) भाड्याने देणे आहे

संपर्क : मो.9503174704, 9503175856



## प्रियंका आय केअर हॉस्पीटल
डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र

पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा.
फोन.222233, मो.नं.9423222266

डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन

उपलब्ध सुविधा...

- मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
- जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
- फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
- सुसज्ञ ऑपरेशन थिएटर • एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
- जपानच्या अत्याधुनिक कॉम्प्युटरवर नेत्र तपासणी व चष्म्याचे नंबर काढण्याची सोय
- नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार • लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय

वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)

अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद

## सिध्दीविनायक ऑप्टीकल्स्
आमच्याकडे नंबरचे चष्मे व गॉगल्स योग्य दरात मिळतील.
बॅंक ऑफ इंडिया शेजारी, बसस्टॅन्ड समोर, करमाळा. प्रोप्रा : वर्षा गायकवाड मो.९५२७२६८१८१/७७५६८२५८२६

# कोळगाव धरण परिसरातील वीजेचा प्रश्न कायम सुटणार : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : कोळगाव धरण परिसरातील वीजेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असून अखेर तो कायमस्वरूपी सुटणार आहे. आवाटी सबस्टेशन सहा महिन्यात कार्यान्वीत होईल व या परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा शाश्वत फायदा होईल; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

याबाबत माहिती देताना आ.शिंदे म्हणाले, की गेल्या दोन वर्षापासून कोळगाव धरण शंभर टक्के भरत असल्यामुळे या परिसरातील गावामध्ये मोठ्या प्रमाणावरती ऊस, केळी आदी बारमाही पिकांची लागवड झालेली आहे. असे असूनही सबस्टेशनवरती अतिरिक्त लोड असल्यामुळे पुरेशा दाबाने वीजपुरवठा होत होता. त्यामुळे या परिसरातील नागरीकांची नवीन सबस्टेशनची मागणी अनेक दिवसापासून सुरू होती. या मागणीला मुर्तस्वरूप प्राप्त झाले असून, आवाटी येथे नवीन सबस्टेशन उभारणीसाठी २ कोटी ३७ लाख रूपये निधीची तरतूद झालेली असून, या कामाचा कार्यारंभ आदेश निघालेला आहे.

धरण उशाला असूनही कमी दाबाने मिळणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे येथील नागरीकांच्या घशाला मात्र कोरड होती. अपुऱ्या दाबाने व प्रत्यक्षात चार तासच या भागात वीजपुरवठा केला जात होता. परंतू आता नवीन सबस्टेशनमुळे हा प्रश्न निकाली निघणार आहे. पूर्वीच्या कोळगाव सबस्टेशनवरती गौंडरे, आवाटी, नेरले, निमगाव ह, हिवरे, कोळगाव धरण असा लोड होता. आता नवीन सबस्टेशन झाल्यामुळे कोळगाव सबस्टेशनवरील लोड कमी होणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरीकांना पुरेशा दाबाने आठ तास वीज पुरवठा सुरळीतपणे सुरू होईल; असेही आ.शिंदे यांनी सांगितले.

# 'ऑक्सिजन हब' चा स्मृतीवन वसुंधरा लोकार्पण सोहळा संपन्न

करमाळा(सं.प्र.) : भिलारवाडी येथे आशिर्वाद वृक्ष फाऊंडेशनच्या वतीने साकारण्यात आलेल्या ऑक्सिजन हब चा स्मृतीवन वसुंधरा लोकार्पण सोहळा मकाई सहकारी साखर कारखाना समोर संपन्न झाला.झाडांचे आपल्या आयुष्यातील महत्व लक्षात घेऊन पर्यावरण रक्षणासाठी एक प्रयत्न म्हणून आशिर्वाद वृक्ष फाऊंडेशनच्या वतीने पुणे येथील दि स्काय किचन यांच्या सह्योगातून ७० वेगवेगळ्या झाडांचे मियावाकी तंत्रज्ञानाने घनदाट रोपण करून जैवविविधता जपत एक मिनी जंगल उभारण्यात आले आहे. या स्मृतीवनाचा वसुंधरा लोकार्पण सोहळा ह.भ.प.सुदाम गोरखे महारजा व दि स्काय किचनच्या वृषाली गोसावी यांच्या हस्ते तसेच जिल्हापरिषद सदस्या सवितादेवी राजेभोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला आहे. या कार्यक्रमास तहसीलदार समीर माने, सुशिल बेल्हेकर, तुषार गोसावी, केतन गोसावी, पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे, तालुका कृषी अधिकारी संजय वाकडे, मकाईचे कार्यकारी संचालक हरिश्चंद्र खाटमोडे, सरपंच भारत गिरंजे, रामभाऊ येडे, जगन्नाथ देशपांडे, मुकूंद शिंगाडे, गजेंद्र पोळ यांच्यासह परिसरातील नागरीक उपस्थित होते.



दिव्यरत्न
क्वॉलिटी हाऊसकिपींग मटेरिअल
१ महिन्याच्या बजेट मध्ये २ महिन्याचे मटेरिअल
ऑथोराईज्ड ऑनलाइन रेल्वे/विमान तिकीट बुकींग सेंटर
उत्कृष्ट दर्जाचे वॉशिंग पावडर, वॉशिंग मशीन लिक्वीड, कम्फर्ट, हॅन्डवॉश, फिनेल, हॅन्डमेड बाथ सोप, टॉयलेट क्लिनर(८० रू. लि.), डांबर गोळी, व्हाईट कपड्यांसाठी आला लिक्वीड ८० रू. लिटर
**कपड्याचे साबण(१२० रू. किलो), अंगाचे साबण (२५ रू. पासून पुढे)**
भांड्याचे लिक्वीड, भांड्याचे साबण, पितांबरी, ड्रेनेक्स, जाळी झाडू, लॉंग झाडू, खराटे, बकेट मोप, मॅट, रूम फ्रेशनर, ओडोनील, चिमटे, आकर्षक डिझाईन्सच्या कुंड्या, किचन वायपर, डस्टर क्लॉथ, ग्लास क्लिनर इ. मिळण्याचे एकमेव ठिकाण !
**हॉस्पिटलसाठी लागणारे फिनेल, एअरफ्रेशनर्स, डांबर गोळी होलसेल दरात मिळेल.**
१ महिन्याचे क्लिनिंग किट आकर्षक किंमतीत उपलब्ध
माल क्वॉलिटी.., किंमत कमी !
एकवेळ अवश्य भेट द्या..!!
पत्ता : ज्योती-क्रांती बँकेसमोर, दत्तपेठ, करमाळा.
मो.9420650163


# काँग्रेस(आय) च्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना मानवंदना



करमाळा(सं.प्र.): राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने करमाळा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती चिंतामणी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली व इंदिरा काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रताप जगताप यांच्या नेतृत्वात पोथरनाका येथील महात्मा गांधीच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. यावेळी माजी नगरसेवक राहूल जगताप, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष दस्तगीर पठाण, तालुका अध्यक्ष जावेदभाई शेख, ओबीसी विभागाचे तालुका अध्यक्ष गफूरभाई शेख, तालुका उपाध्यक्ष अशोक घरबुडे, सचिव जैनुदिन शेख, तालुका उपाध्यक्ष मुसा पठाण, रमजान मुलाणी, सोमनाथ अवघडे, महंमद पठाण, हसन मुलाणी, हनुमंत पवार, आनंद झोळ, निखिल शिंदे, नागेश ढाणे, गितेश लोकरे, गणेश फलफले, योगेश राखुंडे, जावेद शेख, अजहर पठाण, संदिप बिल्डर, नितीन चोपडे, पृथ्वीराज जगताप, विश्वराज जगताप, अथर्वराज फाटके तसेच काँग्रेस आयचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

राष्ट्रपिता म.गांधी यांना मानवंदना देऊन राष्ट्रगीत गायन करण्यात आले. तद्नंतर स्व.नामदेवरावजी जगताप यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

आयुर्वेद भवन
पनवेल
आमची दर्जेदार उत्पादने
**रक्तशर्करा नियंत्रण :** स्वीटो नील पावडर व काढा
**जास्वंद तेल :** केसविकारांसाठी
**चोपचिनी काढा :** संधीवात व त्वचा विकारांसाठी
**मसलजेसीक तेल :** वाताचे दुखणे, कंबरदुखी यासाठी सुप्रसिध्द तेल
मिळण्याचे ठिकाण : अभंग आयुर्वेद शिवाजीनगर, करमाळा., जि.सोलापूर
• संपर्क : डॉ.अमित दवे (मो.९८३३०३७२०८) / बी.व्ही.कुलकर्णी (मो.९४०४०४३०९१)



हार्दिक अभिनंदन

अध्यक्ष

असिफ जमादार


श्री.संजय सावंत (नगरसेवक)


श्री.बलभिम शिंदे (मुख्याध्यापक)



श्री.शिवदास कोकाटे (लिपीक, शिक्षण मंडळ)

अध्यक्ष

मझरहर नालबंद

करमाळा नगरपरिषद प्राथमिक शिक्षण मंडळाच्या न.पा.मुली नं.२ या शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी **असिफ फारूक जमादार** यांची तर कै.नामदेवराव जगताप उर्दू शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी **मजहर हुसेन शेख** यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

• संभाजीनगर मित्र मंडळ • संत गोरोबाकाका मित्र मंडळ • प्रभाग क्र.१ मधील नागरीक, करमाळा.


गुणवत्ता शुध्द सोन्याची
माऊली
ज्वेलर्स
उत्तम दर्जा हीच आमची ओळख, एकदा या आणि खात्री करा
आकर्षक व सुबक सोने-चांदीचे दागिणे मिळण्याचे
सुवर्णदालन
श्री.प्रविण प्रदीप जाधव (मो.9860987074)
श्री.प्रशांत प्रदीप जाधव (मो.9960455007)
दत्तपेठ, करमाळा, ता.करमाळा, जि.सोलापुर - ४१३२०३.


माजी नगराध्यक्ष
माजी आमदार
माजी नगराध्यक्ष
करमाळा नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष व श्री गजानन स्पोर्टस् ॲन्ड सोशल क्लबचे संस्थापक/अध्यक्ष
मा.प्रशांत ढाळे
यांना वाढदिवसानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
जयशंकर मजूर सह. संस्था मर्या; करमाळा
चेअरमन - विकास बळीराम ढाळे
अनिकेत विकास ढाळे (गर्व्ह.इंजि ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर)
व ढाळे परिवार, करमाळा.


गेली १३ वर्षे आपल्या सेवेत..
जय बजरंगबली टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, पोंधवडी
कन्याकुमारी
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
कालावधी... दि.१४/११ ते २३/११/२०२२
सहल खर्च : 10,500/-
गुजरात दर्शन
गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी, सोमनाथ, पोरबंदर भालकातीर्थ, व्दारकाधाम नागेश्वर ज्योतिर्लिंग
कालावधी : दि.२४/११ ते ३०/११/२०२२
सहल खर्च : 8,899/-
त्रिस्थळी यात्रा
काशी, गया, अयोध्या, प्रयाग
कालावधी... दि.१८/१२ ते २६/१२/२०२२
सहल खर्च : 9,500/-
केरळ दर्शन
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार हौसबोट,
कालावधी... दि.१६/१/२०२३ ते २३/१/२०२३
सहल खर्च : 17,000/-
गंगासागर दर्शन
गंगासागर, कोलकत्ता, श्री जगन्नाथपुरी धाम कोणार्क, भुवनेश्वर, साक्षीगोपाल
कालावधी... दि.२६/१/२०२३ ते २/२/२०२३
सहल खर्च : 10,000/-
रेल्वे प्रवास, स्लीपर प्रवास
स्थळ दर्शनासाठी बसची व्यवस्था
भोजन व्यवस्था : दोन वेळा चहा, एक वेळ नाष्टा दोन वेळा शुध्द शाकाहारी भोजन
निवास व्यवस्था : पंकेजप्रमाणे २, ३, ४ व्यक्तीमध्ये १ डिलक्स रूम
रेल्वे प्रवास, बस प्रवास, भोजन व्यवस्था व राहण्याची उत्तम सोय !
संपर्क
श्री.मयुर राऊत
(8888333638, 9689488585)


भारतातील सर्वात सुंदर ठिकाण
काश्मिर
श्रीनगर,गुलमर्ग,सोनमर्ग,पहलगाम,वैष्णवीदेवी
२३ फेब्रुवारी ते ७ मार्च २०२३
प्रति व्यक्ती 23,500 रूपये
सुविधा...
रेल्वे प्रवास स्लीपर क्लास
२ X २ बस प्रवास
नाश्ता, दोन वेळा चहा, दोन वेळा भोजन
निवास व्यवस्था...
दोन व्यक्ती मध्ये डिलक्स रूम
बुकींगची अंतिम तारीख दि.२० ऑक्टोबर २०२२
जय बजरंगबली टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स, पोंधवडी
संपर्क : मयुर राऊत (८८८८३३३६३८)

# कमलाई अबॅकस क्लासेसच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

## यशकल्याकणीकडून क्लासेसला मिळाले २५ हजाराचे बक्षीस

करमाळा(सं.प्र.) : प्रो ॲक्टीव्ह अबॅकस प्रा.लि; कंपनीने समर नॅशनल कॉम्पीटेशन जून २०२२ मध्ये घेतली होती. भारतातून एकूण ४५०० च्या वर विद्यार्थ्यांनी सहाभाग नोंदवला होता. त्यापैकी कमलाई अबॅकस क्लासेसच्या ३९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. टार्गेट होतं ६ मिनीटात १०० गणिते सोडवणं. विद्यार्थ्यांनी १ मिनीट ४१ सेकंदात १०० अचूक गणिते सोडवून नंबर पटकावले होते. तसेच इतर शालेय स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवलेले ६ विद्यार्थी व सर्व ४५ विद्यार्थ्यांचा गौरव यशकल्याणी सेवाभावी संस्था करमाळा येथे ३० सप्टेंबरला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशकल्याणीचे गणेश करे-पाटील हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रगती एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्ष एलिझाबेथ आसादे, शिक्षण विस्तार अधिकारी अनिल बदे, जातेगावचे केंद्रप्रमुख संतोष पोतदार, प्रो ॲक्टिव्ह अबॅकस प्रा.लि. प्रतिनिधी तानाजी घोडके सर, नामदेवराव जगताप अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य मिलींद फंड, सुरताल संगीत विद्यालयाचे बाळासाहेब नरारे उपस्थित होते.

● **पश्चिम महाराष्ट्र रिजन मधून कमलाई अबॅकस क्लासेसचे विजेते...** अद्वैत नितीन व्हटकर - झिरो लेवलमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून प्रथम, स्वराली विजयकुमार जाधव - झिरो लेवल मध्ये पश्चिम महाराष्ट्रातून व्दितीय, स्पंदन शरद सावंत - झिरो लेवलमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून तृतीय, दीक्षा दत्तात्रय दिवटे - सेकंड लेवलमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून व्दितीय, गौरव महेश स्वामी- फर्स्ट लेवलमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून तृतीय, तरेश पोपट थोरात- सेकंड लेवलमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून तृतीय, मानव मयूर मुसळे -सेकंड लेवलमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून तृतीय




● **उत्तेजनार्थ विद्यार्थी ...** तेजस्विनी शिंदे, वेदांत घुगे, ईश्वरी पुराणिक, आरव केंडे, युवराज पंडित, आदित्य व्हटकर

● **कॉन्सोलेशन प्राईजचे मानकरी..** सुयश संदीप बोकन, प्रणिती औदुंबर माकुडे, देविका श्रीकृष्ण दीक्षित, यशराज दिपक घाडगे, चैतन्य तुषार कांबळे, शौर्य सागर इंगळे, श्रावणी गणेश क्षीरसागर, प्रणित नारायण राजगुरू, प्रशंसा निलेश होनकळसे, स्वराज सुनील पवार, श्लोक राम बडे, सिध्दी पृथ्वीराज देशमुख, प्रियश नारायण राजगुरू, समर्थ मुकूंद कुलकर्णी, श्रेयश अमोल सूर्यपुजारी, वेदिका सारंग पुराणिक, सावणी दिनेश कुंभार, शुभ्रा दिनेश कुंभार, मधुरा मयुर मुसळे, श्रावण राम बडे, प्रेमराज अनिल पंडित, युवराज अनिल पंडित, ईश्वरी गिरीश गाडेकर, वेदांत गणेश होनकळसे, रूद्र श्रीकृष्ण दीक्षित, श्रवण राम बडे.

● **इतर स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेले विद्यार्थी...** स्पंदन शरद सावंत (इ.२ री) - मंथन परीक्षेत राज्यात बारावी, केंद्रात चौथी, प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्ह्यात तिसरी, बीडीएस परीक्षेत केंद्रात चौथी., यशराज घाडगे (इ.३ री) - एटीएस परीक्षेत केंद्रात सहावा., तेजस्विनी सुनील शिंदे(इ.१ ली) - बुध्दीवंत परीक्षेत राज्यात दुसरी., रणवीर अमोल (इ.१ ली) - केंद्रात १ ला., समर्थ सचिन शेळके (इ.३री) - एटीएस प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात दुसरा व मंथन सा.ज्ञान परीक्षेत राज्यात पाचवा., तरेश पोपट थोरात - मंथन परीक्षेत राज्यात नववा, एटीएस मध्ये राज्यात सहावा व बुध्दीवंत परीक्षेत केंद्रात तिसरा. या सर्व विद्यार्थ्यांचे मान्यवरांनी खूप कौतूक केले.

या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी डेमो सादर केले. गणितांची उत्तरं काही सेकंदातच दिली. विद्यार्थ्यांना या अबॅकस मध्ये फक्त गणित विषयात फायदा होतो असं नसून इतर विषयात याचा काय फायदा झाला तसेच पालकांनी विद्यार्थ्यांवर केलेले विविध प्रयोग व त्याचा फायदा काय झाला, हे पालक व विद्यार्थ्यांनी सादर केले. पालकांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. अबॅकसमुळे तसेच त्यामध्ये घेतल्या जाणाऱ्या ॲक्टीव्हीटीमुळे स्वत:च्या पाल्यात काय बदल झाला हे त्यांनी यावेळी मांडले.

अबॅकस परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना कमलाई अबॅकस क्लासेसच्या संचालिका सौ.मंजुश्री मुसळे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याचबरोबर यशकल्याणी सेवाभावी संस्था कडून सदर क्लासेससाठी २५ हजार रुपयाचे बक्षीस गणेश करे-पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार मंजुश्री मुसळे यांनी केले

# खासदार फंडातून विविध गावात स्ट्रीट लाईट मंजूर

करमाळा(सं.प्र.) : खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर यांच्या सन २०२१-२२ च्या खासदार फंडातून करमाळा तालुक्यातील जातेगाव, मोरवड, खांबेवाडी, खडकी, कामोणे, कुसकरवाडी, आवाटी, निमगाव ह, नेरले, घारगाव, शेलगाव क, श्रीदेवीचामाळ, रावगाव, लिंबेवाडी, राखवाडी, वाघमारे वस्ती, बिटरगाव श्री, वंजारवाडी, पिंपळवाडी, हिवरवाडी, मिरगव्हाण, करंजे, पांडे, वीट, रोशेवाडी, देवळाली, खडकेवाडी, हिवरे या गावांमध्ये स्ट्रीट लाईट दिवे मंजूर झाले आहेत; अशी माहिती भाजपाचे तालुका अध्यक्ष गणेश चिवटे यांनी दिली.

याबाबत माहिती देताना चिवटे म्हणाले, की सन २०१९-२० मध्ये कोरोना महामारीच्या काळात सर्व खासदार फंड हा आरोग्य विभागात खर्च करण्यात आला होता. त्यामुळे विकासकामांना खोडा निर्माण झाला, परंतू येणाऱ्या काळात खासदार रणजितसिंह नाईकनिंबाळकर व जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून करमाळा तालुक्यात राज्य सरकार व केंद्र सरकार यांचा जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून तालुक्यात विविध विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार असल्याचे भाजपाचे गणेश चिवटे यांनी सांगितले.

शिवश्री क्लिनिक
डे केअर सेंटर
डॉ.आशुतोष पोपट कापले
B.H.M.S.(M.U.H.S.) Nasik
जनरल फिजीशियन ॲन्ड होमिओपॅथिक कन्सल्टन्सी
मो.9860982072
उपलब्ध सुविधा...
● ॲडमिट करण्याची सुविधा.
● ई.सी.जी. सुविधा
● बालरूग्णांसाठी वाफेची सुविधा
२४ तास अत्यावश्यक सुविधा
● वेळ : सकाळी ११ ते रात्री १०
आमची वैशिष्ट्ये....
● सर्व आजारांवर ॲलोपॅथिक, होमिओपॅथिक उपचार.
● मुळव्याध, त्वचा विकार उपचार.
● मानसिक आजारांवर उपचार.
● नपुसंगतेवरील उपचार.
● आहारासंबधी योग्य मार्गदर्शन.
● मशीनव्दारे रक्तातील शुगर(BSL) व Blood Precesure तपासणी व उपचार.
● जुनाट मधुमेहातील जखम व संधिवात विकारांवर उपचार
टीप भारतीय सैन्य दलातील जवानांची तपासणी फी घेतली जाणार नाही.
अहमदनगर येथील प्रसिध्द किडनीविकार तज्ञ
डॉ.आनंद काशिद (मुत्रविकार तज्ञ, लैंगिक विकार तज्ञ व किडनी ट्रान्सप्लान्ट सर्जन)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी, करमाळा येथे
ओपीडी वेळ सकाळी १० ते १.००
पत्ता : सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
● सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
दर महिन्याचा तिसरा रविवारी वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

॥ विश्वास हीच परंपरा ॥
आनंद ड्रायफ्रुटस्
खास नवरात्र उत्सवानिमित्त..
प्रोप्रा : अमोल र. हिरण
मो.9270496867, 7057258385
स्वादीष्ट व चविष्ट उपवासाचे पदार्थ मिळण्याचे ठिकाण !
◄ राजगिरा पीठ, भगर पीठ, सिंगाडा पीठ
◄ चौकोनी भगर, पापड, दळायची भगर,
◄ सोमवार भाजणी
◄ सर्व प्रकारची शेंगदाणा चिक्की,
◄ राजगिरा, गुडदाणी, केळीचे वेफर्स,
◄ शाबुदाणा पापडी, हिरवी मिरची वेफर्स,
◄ उपवासाचे स्क्रू, उपवासाचे लोणचे, उपवासाचे बिस्कीट
◄ खडके कंपनीचे राजगिरा व शेंगदाणा चिक्की, राजगिरा रोल
◄ खजूर, शेंगदाणा तेल, शाबुदाणा चिवडा,
◄ शाबूदाणा, शेंगदाणे, भगर, शेंगदाणा लाडू
उत्कृष्ट कंपनीचे व क्वॉलिटीचे ड्रायफ्रुट मिळेल
संपर्क एच.यु.गुगळे कापड दुकाना समोर, मेनरोड, करमाळा.

ग्राहकांच्या उदंड प्रतिसादामुळे दसरा-दिवाळी सणानिमित्त

**सुटींग, शर्टिंग सेवा सुरू !**

खरेदीवर 10% सवलत



# विशाल गारमेंटस् ॲन्ड विशाल टेलर्स


एकवेळ अवश्य भेट द्या !

प्रोप्रा : हेमंत बिडवे (9422447346)
निलेश बिडवे (9422447216)

रेडिमेड सुटींग, शर्टींग होजिअरी

असंख्य मेन्सवेअरच्या व्हरायटी

पत्ता : छत्रपती कॉम्प्लेक्स, पुणे रोड, करमाळा. जि.सोलापूर

स्व.जालिंदर(दादा) जाधव
(माजी सैनिक)

साडे (ता.करमाळा) येथील माजी सैनिक

**स्व.जालिंदर(दादा) जाधव**

यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो; हीच आमची

## भावपूर्ण श्रध्दांजली !

शोकाकुल

विजय अंगदराव लावंड
जोतीराम(नाना) अंगदराव लावंड
शिवाजी अंगदराव लावंड
समस्त लावंड परिवार, करमाळा.




+आमचे मित्र **मा.श्री.प्रविण(आबा) जाधव** व **श्री.प्रशांत जाधव** यांनी करमाळा शहरात नव्याने सुरू केलेल्या **माऊली ज्वेलर्स** या सुवर्णदालनास आमच्या

## हार्दिक शुभेच्छा !

शुभेच्छुक

- शिवछत्र फायनान्स
- शिवछत्र टूर ॲन्ड ट्रॅव्हल्स्
- शिवछत्र बहुउद्देशीय संस्था
- शिवछत्र महिला बचत गट

करमाळा., जि.सोलापूर


Mo.9579191904

॥ श्री कमलाभवानी प्रसन्न ॥

वस्त्र विश्वातील दालन..

# ओंकार कलेक्शन

विजयादशमीच्या मुहूर्तावर शुभारंभ झाला आहे



- सुटींग/शर्टींग
- शालू पैठणी
- साड्या
- कांजीवरम्
- ड्रेस मटेरियल
- होजिअरी
- चिल्ड्रन्स वेअर
- बेंगलोरी सिल्क
- शर्ट/टी शर्ट
- स्पोर्टस् वेअर

एकवेळ अवश्य भेट द्या !

पत्ता : बजाज शोरूम शेजारी, बायपास रोड, कृष्णाजीनगर, करमाळा

विमल ताई हजारे प्लॉटिंग पांडुरंग नगर

# पांडुरंग नगर





आम्ही घेऊन येत आहोत.., **आपल्या स्वप्नातील घर बांधण्यासाठी तुमच्या हक्काची जागा !**

**वैशिष्ट्ये...**

- १००% क्लिअर टायटल
- करमाळा शहरालगत नगरपालिका हद्दीत
- मेनरोड टच वास्तूशास्त्रानूसार प्लॉटींग
- ३०/६० फुटी रस्ता
- बँक, शाळा, भाजीमंडई, हॉस्पीटल व कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ
- २४ तास पाण्याची सुविधा.
- स्ट्रीट लाईट सुविधा. • स्वतंत्र ड्रेनेज लाईन.
- बाजारपेठ जवळ • स्वतंत्र ट्रान्सफार्मर
- प्रत्येक प्लॉटला स्वतंत्र डिमार्केशन
- प्लॉट स्पेस इंडेक्स - १.४७
- अहमदनगर-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गाजवळ




**प्लॉट विक्री सुरू**

त्वरा करा.., मर्यादित प्लॉट शिल्लक !

पत्ता..
**सटवाई मंदिराजवळ, निलज रोड, करमाळा**

9527812393, 8421242525
7972800929, 9975403399




आशिर्वाद
स्व.प्रभाकर ढाळे


आशिर्वाद
स्व.नारायण ढाळे





## मा.श्री.प्रशांत(आण्णा)ढाळे

आपणास वाढदिवसाच्या **हार्दिक शुभेच्छा !**

तुमच्या इच्छा तुमच्या आकांक्षा
उंच उंच भरारी घेऊदेत,
मनात आमच्या एकच इच्छा,
तुम्हाला उदंड आयुष्य लाभु दे..!

• शुभेच्छुक -
**श्री गजानन सोशल अॅन्ड स्पोर्टस् क्लब**
वेताळपेठ, करमाळा, जि.सोलापूर

## सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल
# शिवविचार प्रतिष्ठानचा ॲड.बाबूराव हिरडे यांना पुरस्कार प्रदान



करमाळा(सं.प्र.) : टेंभूर्णी शिवविचार प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा सामाजिक कार्याचा पुरस्कार करमाळा येथील ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष ॲड.डॉ.बाबूराव हिरडे यांना आमदार संजयमामा शिंदे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी विठ्ठलराव शिंदे महाविद्यालयाचे प्राचार्य महेंद्र कदम व शिव–व्याख्याते हर्षल बागल तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयबापू खटके यांचेसह मान्यवर उपस्थित होते. व्यसनमुक्ती व सामाजिक प्रबोधनामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल ॲड.हिरडे यांना हा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल ॲड.हिरडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पोंधवडी येथे ९ ऑक्टोबर मासिक पौर्णिमा उत्सव

करमाळा(सं.प्र.) : नवसाला पावणारा मारूती देवस्थान असलेल्या श्री क्षेत्र पोंधवडी येथे कोजागिरी पौर्णिमे दिवशी ९ ऑक्टोबरला १२० वा आश्विन मासिक पौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त सकाळी साडेदहा ते साडेबारा या वेळेत विनोदाचार्य युवा किर्तनकार ह.भ.प.ज्ञानेश्वर माऊली पठाहे (कर्जत) यांचे हरिकिर्तन होणार असून त्यानंतर उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार जयवंतराव जगताप, जिल्हापरिषदेचे माजी सदस्य उध्दव माळी, दत्तकला शिक्षण संस्थेच्या सचिव मायाताई झोळ, सत्कारमुर्ती प्रा.डॉ.दादासाहेब मारकड यांच्यासह परिसरातील गावाचे सरपंच, सोसायटीचे चेअरमन, सामाजिक कार्यकर्ते, उपसरपंच आदीजण उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रम भाविकांनी उपस्थित रहावे; असे आवाहन जय बजरंग बली अन्नछत्र मंडळ व पोंधवडी ग्रामस्थांनी केले आहे.




# मागील चार दिवसापासून बेपत्ता तरूणाचा मृतदेह सापडला बारवात

करमाळा (सं.प्र.) : मागील चार ते पाच दिवसांपासून बेपत्ता असलेल्या तरूणाचा मृतदेह किल्ला विभाग येथील बारावात सापडला आहे.

करमाळा शहरातील साठेनगर भागातील तरूण अमोल बारीकराव आलाट (वय–३३) याची बेपत्ता झाल्याची तक्रार परिवारातील प्रतिनिधींनी ४ ऑक्टोबरला पोलीसात दिली होती. तो काहीही न सांगता घरातून बाहेर निघून गेला होता. त्याच अनेक ठिकाणी शोध घेऊनही तो न सापडल्याने पोलीसात हरवल्याची नोंद करण्यात आली होती. ६ ऑक्टोबरला सकाळी किल्ला विभाग येथील बारवात नवरात्रोत्सवातील घटाचे निर्माल्य टाकण्यासाठी गेलेल्या नागरीकांना तरूणाचा मृतदेह पाण्यात तरंगताना दिसला. सदर तरूणाचा चेहरा छिन्नविछीन्न झालेला होता. सदरची माहिती पोलीसांना मिळाल्यानंतर त्या ठिकाणी तरंगत असलेला मृतदेह बाहेर काढला. सदरचा मृत्यू हा बुडून झाल्याचं प्रथमदर्शी दिसून येत आहे. मृतदेह बाहेर काढल्यानंतर शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. सदर घटनेची माहिती समजल्यावर नागरीकांनी मृतदेह पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती.




आशिर्वाद
कै.डि.के.सावंत
आशिर्वाद
कै.सुभाष(आण्णा) सावंत
आशिर्वाद
कै.प्रभाकर ढाळे
आशिर्वाद
कै.नारायण ढाळे
विकासप्रिय आमदार
कर्तव्यदक्ष नगरसेवक
आमचे जिवलग मित्र
माजी नगराध्यक्ष
मा.प्रशांत ढाळे
यांना दि.६ ऑक्टोबर रोजी असलेल्या
वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
श्री छत्रपती शिवाजी तरूण मंडळ, सावंतगल्ली, करमाळा


नूतन जिल्हा उपाध्यक्ष
राष्ट्रवादी काँग्रेसच्या
सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष पदी
वांगी गावचे युवक नेते
मा.श्री.
राजकुमार देशमुख
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
शुभेच्छुक
श्री.हनुमंत मांढरे-पाटील
ता.अध्यक्ष- राष्ट्रवादी काँग्रेस, करमाळा.
श्री.हनुमंत मांढरे-पाटील
(ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस)

## वृध्द महिलेस मोटारसायकलची धडक उपचारादरम्यान मृत्यू

करमाळा (सं.प्र.): पायी चालत असलेल्या ७० वर्षाच्या महिलेस पाठीमागून मोटारसायकलस्वारने धडक दिल्याने महिलेचा उपचार दरम्यान मृत्यू झाल्याची घटना १४ सप्टेंबर रोजी गुळसडी येथे घडली आहे. या प्रकरणी मोटारसायकल चालकाविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. यात आण्णा रामा कांबळे यांनी करमाळा पोलीसात फिर्याद दिली असून त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझी आई कांताबाई रामा कांबळे (वय-७०) ही १४ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास गुळसडी एसटी स्टॅन्ड जवळ असलेल्या किराणा दुकानातून किराणा घेऊन घरी येत असताना पाठीमागून राजू दास याने मोटारसायकलने जोराची धडक दिली. या अपघातात माझी आई गंभीररित्या जखमी झाली. हे समजल्यानंतर आम्ही तिथे गेलो असता, राजू दास व अवि कांबळे यांनी तिला दवाखान्यात घेऊन गेले आहेत, असे समजले. त्यानंतर करमाळा येथून प्राथमिक उपचार करून आई कांताबाई हिच्यावर पुणे येथे उपचार सुरु केले, परंतू उपचार चालू असताना २१ सप्टेंबर रोजी रात्री तिचे निधन झाले. या प्रकरणी राजू दास यांनी आपल्या ताब्यातील मोटारसायकल क्र.एमएच १४ एबी १५४१ ही भरधाव वेगाने व हयगयीने चालवून कांताबाई कांबळे यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

## केडगाव येथे दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्यावर पोलीस कारवाई

करमाळा(सं.प्र.) : केडगाव येथे दारु पिऊन आरडाओरडा करून गोंधळ घालताना ४२ वर्षाच्या प्रौढास करमाळा पोलीसांनी पकडले आहे. या प्रकरणी त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात पोलीस कॉन्स्टेबल शेखर बागल यांनी फिर्याद दिली असून, त्यांनी म्हटले आहे, की आम्ही चिखलठाण, जेऊर दूरक्षेत्र हद्दीत पेट्रोलिंग करत असताना एका माहितीदाराकडून केडगाव येथील सचिन किसन बोराडे हा दारू पिऊन मोठमोठ्याने ओरडून गोंधळ करत असल्याचे समजले. आम्ही त्यास पकडून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.

## एजंटा मार्फत लावलेल्या लग्नानंतर विवाहित मुली पसार
### करमाळा तालुक्यातील दोन कुटूंबाची फसवणूक

करमाळा(सं.प्र.) : : एजंटाच्या मदतीने लावलेल्या लग्नानंतर विवाहित मुली बेपत्ता झाल्याच्या नुकत्याच दोन घटना करमाळा तालुक्यामध्ये घडल्या आहेत. यामध्ये एकाचे लग्न झाल्याच्याच दिवशी विवाहिता पळून गेली आहे. तर दुसरी विवाहिता लग्नाच्या नऊ दिवसानंतर पळून गेली आहे.

मधल्या काळामध्ये मुलींचं प्रमाण मुलांच्या तुलनेत कमी झाल्याने सध्या मुलांच्या लग्नासाठी सहजासहजी मुलगी मिळत नाहीत. नोकरी, संपत्ती, शहरात वास्तव्य अशा अपेक्षांमुळे ग्रामीण भागातील बेरोजगार अथवा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या तरूणांच्या लग्नाचा प्रश्न दिवसेंदिवस कठीण होत चालला आहे. सर्व प्रयत्न संपल्यानंतर असे अनेक कुटूंब लग्न जुळवून देणाऱ्या एजंट लोकांच्या माध्यमातून लग्न जुळवण्याचे प्रयत्न करत आहेत. अशाचप्रकारे करमाळा तालुक्यातील मांजरगाव व चिखलठाण क्र.१ अशा दोन गावातील दोन तरूणांची लग्न झाले आहे व त्या दोन्ही परिवाराची फसवणूक झाल्याची माहिती समोर आली आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये तेच एजंट आहेत. सुरूवातीला मांजरगाव व चिखलठाण क्र.१ येथील परिवाराने सुरसवाडी (ता.इंदापूर) येथील एका पुरूष एजंटकडे लग्नासाठी मुलीची मागणी केली होती. या एजंटने परभणी येथील एका महिला एजंट मार्फत दोन लग्ने लावून दिली आहेत. मांजरगाव येथील तरूणाशी लग्न केलेली मुलगी लग्न झाल्या दिवशीच येताना तुळजापूर मंदिर परिसरातून पसार झाली तर चिखलठाण क्र.१ मधील तरूणाशी लग्न झालेली मुलगी लग्नाच्या नवव्या दिवशी रात्री साडेबाराच्या आसपास पळून गेली. या दोन्ही कुटूंबाने फसवणुकीचे गुन्हे पोलीस स्टेशनमध्ये दाखल केले आहेत. मांजरगाव कुटूंबाने तुळजापूर येथे गुन्हा दाखल केला तर चिखलठाण कुटूंबाने पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदविला आहे. लग्न जमविण्याआधी मुलीचे दिलेले आधारकार्ड, जातीचा दाखला इ. गोष्टी फसवणुकीनंतर नातेवाईकांनी तपासल्या असता त्या खोट्या असल्याचे सिध्द झाले.

## गौंडरे येथे जुगार खेळणाऱ्यावर पोलीसांची धाड

करमाळा (सं.प्र.) : गौंडरे येथे जुगार खेळणाऱ्यावर पोलीसांनी धाड टाकली असून त्यात पाच जणाविरूध्द गुन्हा दाखल केला असून ३६०० रूपये रोख व इतर मोबाईल असा ११ हजार ६०० रूपयाचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे. हा प्रकार ३ ऑक्टोबरला दुपारी सव्वातीन वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ महादेव जगताप यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की तालुक्याच्या पूर्व भागात गस्त घालत असताना गौंडरे फाटा येथे दिनकर अंबारे यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडजवळ काहीजण पत्त्याचा डाव खेळत असल्याचे समजल्यावर त्या ठिकाणी हवालदार उबाळे, पोलीस नाईक ढवळे, पोलीस कॉन्स्टेबल जगताप, काझी व मी असा आम्ही तेथे जाऊन छापा टाकला असता, तेथे खंडू महादेव दयाळ (रा.मुरूड, ता.लातूर), सागर जनार्दन कारंडे (रा.केम), दिनकर सुखदेव अंबारे (रा.गौंडरे), रमजान शेख (परांडा) व नितीन गोरख तळेकर (केम) हे जुगार खेळताना आढळले. त्यांच्याकडून पत्त्याचा डाव, ३६०० रूपये रोख व प्रत्येकी दोन हजार रू. किंमतीचे चार मोबाईल असा एकूण ११ हजार ६०० रूपयाचा ऐवज जप्त केला आहे.

## बांधकामाचे ६२ हजार किंमतीचे सेंट्रींग साहित्य गायब

करमाळा(सं.प्र.) :कोर्टी येथे अज्ञात चोरट्यांनी ६२ हजार रूपये किंमतीचे बांधकामातील सेंट्रींग साहित्य लंपास केले आहे. या प्रकरणी सागर झुंबर सायकर यांनी फिर्याद दिली असून त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी राठीराशीन (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील रहिवाशी असून, सध्या अशोक नारायण शिंदे (रा.कोर्टी, ता.करमाळा) येथे बांधकामाचे सेंट्रिंग काम करत आहे. २९ सप्टेंबरला नेहमीप्रमाणे माझ्या सहकाऱ्यांसोबत काम उरकून सायंकाळी सहा वाजता पत्राशेड मध्ये सर्व सेंट्रींगचे साहित्य ठेवून घरी गेलो. दुसऱ्या दिवशी ३० सप्टेंबर रोजी नेहमीप्रमाणे सेंट्रींगचे काम करण्यासाठी आलो असता, त्याठिकाणी आम्हाला साहित्य दिसून आले नाही. या साहित्यामध्ये लोखंडी प्लेटा, लाकडी फळ्या, कटर मशीन, लाकडी दांड्या, हातोडा असे एकूण ६२ हजाराचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी पळविल्याचे लक्षात आले.

## २ कोटी १० लाख अपहार प्रकरणातील आरोपी संजय दगडे यास जामीन

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील बंधन बँकेमध्ये २ कोटी १० लाख रूपयांचा अपहार झालेला होता. या प्रकरणातील आरोपी संजय दगडे यांचा कोणताही सहभाग नसल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर सदरचा युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपी संजय रखमाजी दगडे यास अटी व शर्तीवर २५ हजार रूपयांच्या जात मचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी तर्फे ॲड.रितेश थोबडे, ॲड.निखिल पाटील यांनी काम पाहिले.

यात हकीगत अशी, की १२ फेब्रुवारी २०२१ रोजी करमाळा येथील बंधन बँकेमध्ये २ कोटी १० लाख रूपयांचा अपहार झालेला होता. सदर प्रकरणी विनायक गुळप्पा तोंनशाळ यांनी करमाळा पोलीस स्टेशन येथे तशी फिर्याद दिली होती. सदर फिर्यादीमध्ये १२ फेब्रुवारी २०२१ रोजी बँकेतून ३०-३० लाखाचे सात ट्रांजेक्शन्स असे एकूण २ कोटी १० लाखाचे झालेले होते. परंतू करमाळा बँकेच्या मिरर अकाउंट मध्ये दाखवत असून प्रत्यक्षात मात्र कसलेही कागद सदर ब्रँच मध्ये उपलब्ध नव्हते. सदरची रक्कम संजय रखमाजी दगडे यांचे बँक खात्यात ९० लाख तसेच विलास मधुकर नादरगे पाटील यांचे बँक खात्यात १ कोटी २० लाख व तेथून पुढे महावीर लॉजिस्टीक व अजित लाला जगताप तसेच साई सुपर मार्केट व चिराग शहा यांचे खात्यामध्ये सदरची रक्कम वर्ग झाल्याचे निदर्शनास आलेले होते. सदर प्रकरणी तत्कालीन बँक व्यवस्थापक राहूल साहेबराव मुंडे, विलास मधुकर नादरगे पाटील, संजय रखमाजी दगडे व अजित लाला जगताप यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकररी राहूल मुंडे, अजित जगताप यांना अटक करण्यात आलेली असून सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा सोलापूर हे करत आहेत. यातील आरोपी संजय दगडे याने सुरूवातीला बार्शी येथील अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश यांच्याकडे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज फेटाळण्यात आला होता. नंतर त्याने ॲड.थोबडे व ॲड.पाटील यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली व आरोपीस कोर्टाने अंतरिम जामीन अटी व शर्तीवर मंजूर केलेला होता.




विमाक्षेत्रातील जागतिक पातळीवरील सर्वोच्च पुरस्कार (एम.डी.आर.टी.)
**श्री.चेतन किंगर** यांना मिळाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !



शुभेच्छुक
इथं सौंदर्य जन्म घेतं..
**होलसेल साडी डेपो**
सुरतच्या होलसेल भावात साड्या मिळतील.
**लखमीचंद क्लॉथ स्टोअर्स** भवानीपेठ, करमाळा.
ॲड.आशुतोष ल.हासिजा (मुंबई हायकोर्ट) मो.7387832186
प्रोप्रा : मुन्नाशेठ हासिजा मो.9172092187





स्व.कस्तुराबाई राधाकिसन चौधरी

# भावपूर्ण श्रध्दांजली !

**स्व.कस्तुराबाई राधाकिसन चौधरी**
यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे परिवाराचे दु:खात आम्ही सहभागी आहोत. ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना !

शोकाकुल
**ओम मित्र मंडळ, करमाळा.**




**व्यापारी गाळेसहीत**
**तीन मजली इमारत विकणे आहे**

महात्मा गांधी हायस्कुलच्या मागे व भाजी मंडई जवळ व चार व्यापारी गाळे असलेली तीन मजली इमारत विकणे आहे

संपर्क : मो.5857833300 / 9767378410

# हिवरे येथे महिला आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

करमाळा(सं.प्र.): नवरात्र महोत्सवा निमित्त हिवरे येथे आयोजित केलेल्या महिला आरोग्य तपासणी शिबीरात १६८ महिला व मुलींची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार देण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ.श्रध्दा भोंडवे, वरकुटे उपकेंद्राच्या वैद्यकिय अधिकारी डॉ.कोमल शिर्के-दुधे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच सुनिता माळी, उपसरपंच मैनाताई फरतडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंभुराजे फरतडे, सदस्या स्वाती ठोंबरे, अश्विनी फरतडे, चित्रा शिंदे, सुकेशनी फरतडे आदी मान्यवर उपस्थित होते. शिबीरात महिलांचे हिमोग्लोबीन, शुगर व ब्लडप्रेशर तपासणी करण्यात आले. या शिबीरासाठी करमाळा शहरातील रेवती हॉस्पिटलचे डॉ.उमेश जाधव व डॉ.उर्मिला जाधव यांनी चार हजार रूपयाचे मेडीसीन उपलब्ध करून दिले तसेच दोघांनी या शिबीरास उपस्थित राहून रूग्णांची तपासणी केली. या शिबीरात डॉ.सुहास शिंदे, आरोग्य लॅब टेक्नीशियन रणजित काळे, मनोज पद्माळे, आरोग्यसेविका सुरेखा खोबरे, कल्पना माने, आशा सेविका मनिषा फरतडे, शारदा डौले, अनुसया पवळ, संगीता ओहोळ, राणी डिसले यांनी रूग्णांवर उपचार केले.

# पाटील गटाचे समर्थक राजकुमार देशमुख यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

करमाळा (सं.प्र.): माजी आमदार नारायण पाटील गटाचे कट्टर समर्थक व वांगीचे उपसरपंच राजकुमार देशमुख यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये तालुका अध्यक्ष हनुमंत मांढरे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली व जिल्हाध्यक्ष बळीराम साठे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. यावेळी जि.प.सदस्य निळकंठ देशमुख, भोजराज सुरवसे, जिल्हा उपाध्यक्ष गौरव झांजुर्णे, शेतकरी संघटनेचे आण्णा सुपनवर, ओबीसी सेलचे दत्ता अडसुळ उपस्थित होते. यावेळी राजकुमार देशमुख यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. आगामी काळात पक्ष



संघटन मजबूत करण्यासाठी तसेच जिल्हापरिषद व पंचायत समिती मध्ये पक्षाच्या जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

# वकील संघाचे माजी अध्यक्ष अॅड.विलास चौधरी यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : करमाळा वकील संघाचे ज्येष्ठ विधिज्ञ व माजी अध्यक्ष अॅड.विलास शंकरराव चौधरी (वय-७०) यांचे अल्पशा आजाराने ४ ऑक्टोबर ला निधन झाले. त्यांचे मागे पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. करमाळा बार असो;चे सहसचिव अॅड.विनोद चौधरी यांचे ते वडील होते. त्यांचेवर चौधरीवस्ती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.




06 OCT
नाही जोड आपल्या
नेतृत्वाला
सलाम करतो तुमच्या
कर्तुत्वाला
माजी नगराध्यक्ष
प्रशांत आण्णा ढाळे
या जन्मदिनी
दीर्घायुष्याच्या अनंत शुभेच्छा..!
*शुभेच्छुक :-
संस्कृती प्रतिष्ठान,
करमाळा


उपप्राचार्य, कनिष्ठ विभाग
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
विश्वस्त
चेअरमन
सहसचिव
प्राचार्य
मार्गदर्शक
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय
यशवंतराव चव्हाण
महाविद्यालय कनिष्ठ विभागाचे
उपप्राचार्य, कॅप्टन
मा.संभाजीराव किर्दाक सर
यांना वाढदिवसानिमित्त..
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सेवकांची सह.पतसंस्था मर्या; करमाळा
चेअरमन, सर्व संचालक व सभासद
एन.सी.सी.कॅडेट व एन.एस.एस.स्वयंसेवक
मा:विलासराव घुमरे (सर)
सचिव, विद्या विकास मंडळ करमाळा.

## न्यू प्रविण सुपर मार्केट

- बोल्ड नं.१ बदाम – ६५० रू. किलो
- नं.१ काजू – ७०० रू.किलो
- पिस्ता – २५० रू. पावकिलो
- मनुका – ६० रू. पावकिलो
- खजूर (डेटक्राऊ) – १४० रू अर्धाकिलो
- खजूर – ७० रू. अर्धाकिलो
- केळी वेफर्स – १०० रू. अर्धाकिलो
- जोडगहू – ६० रू. किलो
- पाणीपुरी – २५ रू. पावकिलो
- पॉपकॉर्न मका – ३० रू. पावकिलो
- मोहूरी(बारीक) – ८० रू. किलो
- महावीर पापड – ११० रू. अर्धाकिलो
- नाचणी – ५० रू.किलो

**स्पेशल कडधान्य...**

- मटकी – १०० रू. किलो
- मटकी स्पे.गावरान – १३० रू. किलो
- काबोली – ८० रू. किलो
- वटाणा हिरवा – ६५ रू. किलो
- मुग(बारीक) – ७० रू.किलो
- चवळी – ७० रू.किलो
- अख्खा मसुर – ९० रू.किलो
- भारी राजगिरा – १०० रू.किलो
- पाणीपुरी वटाणा – ७० रू. किलो

**गुळभेंडी, सुरती, हूरडा बी मिळेल.**

- नं.१ २१८९ गहू – ३० रू.किलो
- नं.१ २४९६ गहू – ३१ रू.किलो
- ज्वारी(बेस्ट) – ३५ रू.किलो
- नं.१ बाजरी – ३० रू.किलो

संपर्क होलसेल भावात किराणा माल मिळेल.

ज्योती-क्रांती बँकेच्या शेजारी, दत्तपेठ, करमाळा
मो.9168052318

**सा.संदेश वार्षिक वर्गणी १५० रू. भरून घरपोच वर्षेभर अंक मिळवा..!**


# मका हमीभाव खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू

करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र स्टेट को.ऑप. मार्केटींग फेडरेशन यांचे वतीने विठ्ठल सर्वसाधारण सह.संस्थेव्दारे तालुक्यातील मका उत्पादक शेतरक्यांच्या सोय व वाजवी दाम मिळणेसाठी आमदार संजयमामा शिंदे व माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या मार्गदर्शना–खाली व प्रयत्नातून शासनाच्या आधारभूत किंमत योजने अंतर्गत मका खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी सुरू झाली आहे. अशी माहिती संस्थेचे सचिव सुजीत बागल यांनी दिली. मकाला हमीभाव दर प्रतिक्विंटल १९३२ रू. इतका आहे. तरी शेतकऱ्यांनी सातबारा उतारा, आठ अ, पिकपेरा, आधार लिंक असलेले बँक पासबूक झेरॉक्स, आधारकार्ड आदी कागद पत्रांसह १५ ऑक्टोबर पर्यंत संस्थेच्या करमाळा मार्केट यार्ड येथील सोलापूर डिसीसी बँके शेजारील कार्यालयात ऑनलाइन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ९०११९७४११५ या क्रमांकावर संपर्क साधावा; असे आवाहन संस्थेचे व्यवस्थापक आदिनाथ मोरे यांनी केले आहे.

करमाळा तालुक्यातील मका उत्पादक शेतकऱ्यांना शासकीय हमीभावाप्रमाणेच भाव मिळावा; यासाठी माजी आमदार जयवंतराव जगताप, आमदार संजयमामा शिंदे यांची सूचना, प्रयत्न व सहकार्य, मार्गदर्शनानूसार सदरचे हमीभाव खरेदी केंद्र सुरू करत असल्याची व यासाठी जिल्हा मार्केटींग अधिकारी एच.डी. भोसले यांचे देखील सहकार्य झाल्याची माहिती सुजीत बागल यांनी दिली.

तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करून लाभ घ्यावा; असेही आवाहन सुजीत बागल यांनी केले आहे.





शुभेच्छुक
राहूल किरवे, अलिम बागवान
शफीक शेख, करमाळा.

॥ श्रीराम समर्थ ॥
## श्री गजानन आयुर्वेद
मल्टीस्पेशालिटी स्पाईन ऑर्थो केअर सेंटर

डॉ.श्री.दिपक सुर्यकांत पाटील — एम.डी.(आयुर्वेद), पुणे
I.S.O.9001-2018 Certified
डॉ.सौ.वैष्णवी दिपक पाटील — आयुर्वेदाचार्य (मुंबई)

आयुर्वेदाचे वरदान–ऋतू बदलानूसार 'पंचकर्म' व्दारे शरीरशुध्दी
– वमन/विरेचन –

**खालील आजारावर उपयुक्त...**
वाढलेले वजन, आम्लपित्त, जुनी सर्दी, पिंपल्स कफाचा त्रास, पोटाच्या तक्रारी, स्किन इन्फेक्शन सोरियासिस, Eczema, वाढलेली उष्णता, स्त्रीयांमधील पाळीच्या तक्रारी P.C.O.D., स्त्री–पुरूष वंध्यत्व, थायरॉइडचा त्रास इ.

**उपलब्ध सुविधा...**
- प्रकृतीपरिक्षण–नाडीपरिक्षण
- पंचकर्मव्दारे शरीरशुध्दी
- प्रतिकारशक्ती वाढविणारी रसायन चिकित्सा
- ऋतुचर्या–दिनचर्या मार्गदर्शन
- अनुभवी प्रशिक्षित केरळीयन पंचकर्म स्टाफ

पत्ता : 'श्रीस्मरण', बिल्डींग, शाहूनगर(सेकंड लेन), श्रीकमलाभवानी रोड, करमाळा.
मो.9822997409 / 9970765945
www.spineorthoayurved.com shrideepak17@gmail.com shrigajananayurved Shri Gajanan Ayurved Multispecialty Spira Ortha Care

# अस्थमा(दमा) शिबीर

सर्दी, खोकला, दमा, श्वासाचे वारंवार होणाऱ्या विकारासाठी

वर्षे ८ वे — **औषध प्राशन शिबीर** — नांव नोंदणी सुरू

कोजागिरी पौर्णिमा या दिवशी

हे औषध संपुर्णत: आयुर्वेदिक असून, हे औषध फक्त कोजागिरी पौर्णिमेला बनवून दुधाबरोबर घ्यावे लागते.

**हजारो रूग्णांना यशस्वी चिकित्सा**

औषधाचा खर्च ४०० रू. (प्रत्येकी)

• औषध मिळण्याचे ठिकाण व वेळ •
## सन्मति जनरल स्टोअर्स
दत्तपेठ, करमाळा., जि.सोलापूर. मो.९४२३३३६९३०

हे औषध फक्त वर्षातून एकदा कोजागिरी पौर्णिमेला दिले जाते.

• शुक्रवार दि.७/१०/२०२२(करमाळा) • रविवार दि.९/१०/२०२२ (पंढरपूर) • वेळ : सकाळी १० ते रात्री १० पर्यंत

मुख्य शाखा : स्वानुभूती आयुर्वेद पंचकर्म सेंटर आणि दातांचा दवाखाना हरीओम रेसीडेंसीजवळ, पंढरपूर–पुणे रोड, इसबावी, पंढरपूर.

डॉ.सुमोद दोशी (M.D. आयुर्वेद) संपर्क : Mo.9421040328


AK
Anandi Jewellers
गोल्डन दिवाळी ऑफर
दिवाळी निमित्त सोन्याच्या दागिने खरेदीवर सोन्याचे
कॉईन मोफत
* स्किम - ५ ग्रॅम व त्या पुढील सोन्ये खरेदीवर
दि. ३ ऑक्टोबर २०२२ ते
दि. २७ ऑक्टोबर २०२२ पर्यंत.
नियम व अटी लागू.
मंगलमय सुंदरता..
अनोख्या क्षणाची..
आनंदी ज्वेलर्स
मेनरोड, करमाळा
• फोन (०२१८२)२२२२०९ मो.९४२०९१५०९९


लेटस्ट फॅशन तेही
भरपुर क्वांटीटी मध्ये...
दिवाळी धमाका
वस्त्रखरेदी
महासणांची..
गॅरंटी हमखास
बक्षिसांची..
असंख्य व्हरायटी व भरपूर स्टॉक
दिवाळीसाठी संपुर्ण व्हरायटी
स्टॉक मध्ये उपलब्ध....
यश कलेक्शन
मेन रोड, करमाळा, जि.सोलापूर